॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. २९ ( प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागामार्फत समाजातील सर्व घटकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध कौशल्याधिष्ठित ऑनलाइन प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. त्यासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू असून १० ऑगस्ट पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी, नोकरदार, व्यावसायिक, गृहिणी तसेच शिक्षण अपूर्ण राहिलेल्या नागरिकांना घरबसल्या दर्जेदार शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याचा या उपक्रमामागील उद्देश आहे.

जागतिकीकरणामुळे देश-विदेशातील रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात वाढत असून विविध विदेशी भाषांतील तज्ज्ञांची मागणीही वाढत आहे. ही गरज लक्षात घेऊन विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या मार्गदर्शनाखाली आजीवन अध्ययन व विस्तार विभागाने कौशल्यविकासाला चालना देणारे विविध ऑनलाइन अभ्यासक्रम उपलब्ध करून दिले आहेत.

या अभ्यासक्रमांमध्ये जर्मन भाषा (A1 स्तर), जपानी भाषा, संस्कृत, मोडी लिपी यांसह सायबर गुन्हे आणि कायदे, मानसशास्त्रीय कसोट्या व मोजमाप, सहकार अभ्यासक्रम, कवयित्री बहिणाबाई : जीवन व काव्य, तथागत भगवान बुद्ध आणि त्यांचे तत्त्वज्ञान आदी प्रमाणपत्र अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

या उपक्रमाबाबत आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक प्रा. मनीष जोशी यांनी सांगितले की, "शिकायला वयाचे बंधन नसते, फक्त शिकण्याची जिद्द असावी. आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून शिक्षणाची गंगा समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न आहे. ज्यांचे शिक्षण अपूर्ण राहिले आहे किंवा ज्यांना नवीन कौशल्ये आत्मसात करायची आहेत, अशा प्रत्येकाने या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा.

अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे अधिकृत प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे. सर्व ऑनलाइन वर्ग शनिवार व रविवारी आयोजित केले जाणार असून विषयतज्ज्ञ व अनुभवी प्राध्यापकांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळणार आहे.ऑनलाइन पद्धतीने घरबसल्या अभ्यासक्रम पूर्ण करण्याची सुविधा, विषयतज्ज्ञ व अनुभवी मार्गदर्शकांचे मार्गदर्शन, शनिवार व रविवार ऑनलाइन वर्ग, अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यापीठाचे अधिकृत प्रमाणपत्र ही या अभ्यासक्रमांची वैशिष्ट्ये आहेत.

प्रवेशासाठी इच्छुकांनी विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन ऑनलाइन अर्ज करावा. तसेच अधिक माहितीसाठी ०२५७-२२५७४९५, ०२५७-२२५८४९६ किंवा ७०५८५८७६३६ या क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे करण्यात आले आहे.

**बातमी नं. २**

जळगाव, दि. २९ ( प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र शाळेतील विभागातील प्राध्यापक डॉ. पद्माकर जी. चव्हाण यांचा संशोधन निबंध आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित स्मॉल या वैज्ञानिक नियतकालिकामध्ये प्रकाशित झाला आहे. 11.8 इम्पॅक्ट फॅक्टर असलेल्या या जर्नलमध्ये संशोधन प्रसिद्ध झाल्याने विद्यापीठाच्या संशोधन क्षेत्रातील गुणवत्तेला आंतरराष्ट्रीय स्तरावर पुन्हा एकदा अधोरेखित करणारे यश मिळाले आहे.

खानदेशातील ग्रामीण भागातून शिक्षण घेतलेल्या डॉ. पद्माकर चव्हाण यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातून भौतिकशास्त्र विषयात एम.एस्सी. पदवी संपादन केली. त्यानंतर त्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून पीएच.डी. पूर्ण केली. पीएच.डी.नंतरच्या संशोधनासाठी त्यांची भारतातील अग्रगण्य इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स (IISc), बेंगळुरू येथे निवड झाली. तेथे उच्च दर्जाचे संशोधन पूर्ण केल्यानंतर त्यांनी आपल्या जन्मभूमीत परत येत २०१२ पासून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात अध्यापन व संशोधन कार्याला सुरुवात केली.

डॉ. चव्हाण यांचा "ट्युनेबल इंटरफेशियल प्रॉपर्टीज ऑफ सीडीएस/सीडीएसई नॅनोहेट्रोस्ट्रक्चर्स : एक्सपेरिमेंटल अँड थिअरेटिकल एक्सप्लोरेशन" हा शोध निबंध वायली-व्हीसीएच प्रकाशित स्मॉल या जागतिक कीर्तीच्या जर्नलमध्ये प्रसिद्ध झाला आहे. 11.8 इम्पॅक्ट फॅक्टर असलेल्या या जर्नलचा समावेश जगातील अग्रगण्य २५ टक्के वैज्ञानिक नियतकालिकांमध्ये होतो. विद्यापीठांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मानांकन हे संशोधनाच्या गुणवत्तेवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असते. त्यामुळे डॉ. चव्हाण यांचे हे संशोधन विद्यापीठाच्या शैक्षणिक व संशोधन प्रतिष्ठेला अधिक बळकटी देणारे ठरणार आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, भौतिकशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. जयदीप साळी, विभागप्रमुख डॉ. संजय घोष तसेच विभागातील प्राध्यापकांनी डॉ. पद्माकर चव्हाण यांचे अभिनंदन करून पुढील संशोधन कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

..............................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: २९ जुलै, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता